अति तात्काळ

जिल्हा परिषद पंचायत समित्यांमधील निधीची अफरातफर अफरातफरीची प्रकरणे व दुर्विनियोगाची प्रकरणे त्यावर करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
परिपत्रक क्र. संकीर्ण १०८९/१६१८/२९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जुलै १९८९.

वाचा :- १] शासन पत्र क्र. डीईएन १०७५/१५७३/[३६७]/८, दिनांक ४/१२/७५.

२] शासन पत्र क्र. डीईएन १०७६/२५३७/[१५०१]/८, दिनांक १८/६/७६

३] शासन पत्र क्र. पीआरसी १०८१/सीआर १४६२/८-अ, दिनांक २२ सप्टें. ८

४] शासन पत्र क्र. पीआरसी २३८१/२०४८/पु २०२१/१४, दिनांक १५ जून ८

५] शासन पत्र संकीर्ण १०८९/सीआर ५६१४/२९, दिनांक १६ मे १९८९.

परिपत्रक :-

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा व पंचायत समितीमधील निधीच्या अफरातफरीच्या बऱ्याचशा प्रकरणात ध्ये अफरातफरीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तीकडून अफरातफर करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यास बराच विलंब होतो कदाचित न्यायालयामध्ये अफरातफरीचा आक्षेप सिद्ध होईपर्यंत किंवा शिस्तभंग विषयक कार्यवाही पूर्ण होईपर्यंत वसूली तहकूब केल्याने हा विलंब होत असावा.

अफरातफरीच्या प्रकरणामध्ये आवश्यक कार्यवाहीचे तीन भाग असतात त्यापैकी वसूल करणे, ज्याने ही रक्कम अपहार केली असेल त्याची जबाबदारी निश्चित करून विभागीय कारवाई करणे आणि न्यायालयात दावा दाखल करणे असे हे तीन वेगळे भाग आहेत लेखा परिक्षा अहवालात असे प्रकरण उपस्थित झाल्यानंतर तो अहवाल जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये प्राप्त झाल्यानंतर ४ महिन्याच्या कालावधीत अवधीत त्याचा तो अनुपालन अहवाल संस्थेकडून पाठवावा असतो त्याच अवधीमध्ये निदान अपहारी रकमेची वसूली आणि जबाबदार असलेल्या व्यक्तीची जबाबदारी निश्चित करून कारवाई निश्चितपणे करता येईल.

प्रतिबंधक उपाय योजना – अफरातफरीच्या प्रकरणाच्या कार्यपद्धतीचा आढावा घेऊन कोणकोणत्या कारणामुळे अफरातफर करणे शक्य होत असते ते पहावे. संबंधित कामाची तपासणी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता मधील आणि अन्य संबंधित नियमानुसार पर्यवेक्षकांनी जितक्यावेळा तपासणी आवश्यक होती तितक्यावेळा तपासणी केली काय तसेच पर्यवेक्षकांनी अकस्मात भेटी दिल्या होत्या काय हे पहावे लागेल पर्यवेक्षकीय हेळसांडीमुळे अफरातफर करणे शक्य झाले असे किंवा अफरातफरी उघडकीस येण्यास विलंब झाला असे दिसून आल्यास संबंधित सर्व पर्यवेक्षकांची जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही करावी लागेल केवळ अफरातफर उघडकीला येईल त्यावेळी करून चालणार नाही, तर अशा नियतकालिक आणि आकस्मिक तपासण्या होतात किंवा नाही हे पाहण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिकाऱ्यांची समन्वय बैठकीमध्ये आढावा घ्यावा तपासणी वेळेमध्ये

त्रुटी आढळल्यास संबंधितांना समज द्यावी व आर्थिक वर्षाचे गोपनिय अहवाल लिहिण्यासाठी ठेवावयाच्या टिप्पणीमध्ये नोंद घ्यावी.

अफरातफरीची जबाबदारी निश्चित केल्यावर संबंधित कर्मचा-याच्या अधिका-याच्या विरुद्ध विभागीय चौकशी तसेच पोलिसाकडे गुप्त नोंदविण्याची कार्यवाही विनाविलंब सुरु करावी विभागीय चौकशी सुरु झाल्याना पासुन ती ६ महिन्याच्या आत पुरी झाली पाहिजे त्याचप्रमाणे दुर्विनियोजनास प्रोत्साहन मिळू शकेल अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात यावी सदर प्रकरणे तीन महिन्यात निकाली काढण्यात यावी.

या सूचनांचे आदेशाचे परिपालन काटेकोरपणे होते किंवा नाही याकडे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी स्वत: लक्ष द्यावे व अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये घ्यावयाच्या कार्यवाहीमध्ये कोणत्याच त्रुटी राहणार नाहीत व सर्व प्रकारच्या कार्यवाही विनाविलंब होतील याची दक्षता घ्यावी व कार्यवाही होण्यामध्ये विलंब व उणीवा आढळून आल्यास संबंधित अधिका-या विरुद्ध कडक कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ पा. न. वालावलकर ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१] सर्व विभागीय आयुक्त,
२] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्यकार्यकारी अधिकारी
३] महालेखापाल महाराष्ट्र १ [लेखा परिक्षा] मुंबई,
४] महालेखापाल महाराष्ट्र २ [लेखा परिक्षा] नागपूर,
५] महालेखापाल महाराष्ट्र १ [ओ व ई] पुणे
६] मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण विभाग नवी मुंबई,
७] उपमुख्यलेखा परिक्षक [वरिष्ठ] स्थानिक निधी लेखा मुंबई नाशिक पुणे औरंगाबाद अमरावती व नागपूर
८] सर्व जिल्हाधिकारी सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
९] सर्व मंत्रालयीन विभाग [विधि व न्याय विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग कार्य विभाग सोडून]
१०] संचालक आयुक्त सर्वांगिण विकास यंत्रणा महाराष्ट्र पुणे,
११] संचालक स्थानिक पाल विकास सेवा योजना कोकण भवन नवी मुंबई,
१२] ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने
१३] निवड नस्ती कार्यासन ग्र. २१.